नि.फौ.ख.क्र.३००५७३/२००२
शासन–वि– संजय अग्रवाल व इतर
नि.क्र. १०६०.

मी शपथेवर खरे सांगतो की,

माझे नांव – संजय गणेश देशपांडे
वय अंदाजे ७६ वर्ष, कामधंदा– सेवानिवृत्त,
राहणार– २३ वर्धमान नगर, व्हीआयपी रोड, वर्धा, तह. व जि. वर्धा.

..............................................................................................................

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१७ ची सरतपासणी– सरकारी वकील श्री.एस.एम.दुंगे यांच्या मार्फत.**

१. मी मे २००२ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, वर्धा येथे कार्यरत होतो. अपराध ११०/०२ आणि १२४/०२ पोलीस स्टेशन वर्धा सीटी हे गुन्हे माझेकडे पोलीस अधिक्षक, वर्धा यांचे आदेशाने वर्ग करण्यात आले होते. या गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक वर्धा शहर चंद्रकांत उदगीरकर यांचेकडे होता. जप्तीपत्र्क, मोका पंचनामा, जप्त मुद्देमाल दस्तऐवज माझेकडे वर्ग करण्यात आले होते. मुद्देमाल पोलीस स्टेशनच्या मालखान्यात व कागदपत्र माझेकडे देण्यात आला होता. गुन्हयाचा तपास माझेकडे दिला त्यावेळेस मी मुद्देमाल व कागदपत्राची शहानिशा केली. जप्त मुद्देमाल मला दाखविल्यास मी तो ओळखू शकतो. सदर मुद्देमाल आज न्यायालयासमक्ष हजर नाही. तसेच साक्षीदार हे वयोवृध्द असल्यामूळे त्यांचे तोंडी विनंतीवरुन सरतपास पुढील तारखेपर्यत तहकुब करण्यात येते.

**सरतपास दि.०९.०७.२०२६ पर्यंत तहकुब करण्यात येतो**.

माझे समक्ष

(श्रीमती एम.वाय.डोईफोडे)
मुख्य न्यायदंडाधिकारी,
वर्धा, दिनांक ०९.०७.२०२६.

नि.फौ.ख.क्र.३००५७३/२००२
शासन–वि– संजय अग्रवाल व इतर
नि.क्र. १०६० पुढे वेळ ४.३०
वाजता सुरु......

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१७ ची उर्वरीत सरतपासणी– सरकारी वकील श्री.एस.एम.दुंगे यांच्या मार्फत शपथेवर पुन्हा सुरु –</u>**

२. राजन साल्पेकर हे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सह व्यवस्थापक होते. सरकारी प्रतिभुती खरेदी करण्याकरीता होम ट्रेड कंपनीला २५ कोटी २४ लाख रुपये ठराव वेळेवर घेवून नंतर रक्कम वर्ग केलेली होती. होम ट्रेड कंपनीने कर्ज रोखे खरेदी केले नाही व ते बॅकेला दिले नाही म्हणून बॅकेची फसवणुक केली व त्या कारणाने सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक वर्धा पोलीस स्टेशन श्री.चंद्रकांत उदगिरकर यांनी गुन्हा नोंदविला होता. छापील पहिली खबर वर राजन साल्पेकर यांची सही आहे ती मी ओळखतो कारण त्यांच्या सदर प्रकरणात अनेक ठिकाणी सहया आहे. सदर छापील पहिली खबर अपराध क्रमांक ११०/२००२ सार्वजनिक दस्त असल्यामूळे त्याला **नि.क्र. १०६५** देण्यात येते.

३. जिल्हा विशेष लेखा परीक्षक, श्री.जी.एम.तायवाडे यांनी बँकेच्या अभिलेखाची तपासणी अपराध क्र.११०/२००२ दाखल झाल्यानंतर केली होती. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने होम ट्रेड कंपनीला सरकारी प्रतिभूती खरेदी करण्याकरीता जो ठराव घेतला तो ठराव नियमानुसार नव्हता. सदरची रक्कम होम ट्रेड कंपनीला दिली ती रिजर्व बॅक यांच्या परीपत्राचे उल्लंघन करुन दिली होती. तेव्हा प्रतिभूती खरेदी व्यवहाराच्या रक्कमेचा अपहार झालेला आहे असे त्यांना लेखापरीक्षणात आढळले त्यामूळे त्यांनी अपराध क्रमांक १२४/२००२ दाखल केला. त्याची छापील पहिली खबर अभिलेखावर असून ती नि.क्र.५३४ वर दाखल आहे. त्यानंतर सेबी, रिजर्व बँक ऑफ इंडीया, होम ट्रेड कंपनी, नाबार्ड, प्रतिभूतीचे कार्यालय यांना पत्र दिले होते.

(सदरचे पत्र हे सदरच्या खटल्याचा रेकॉर्ड हा भरपूर पानांचा असल्यामूळे तसेच जनरल मुद्देमाल व मौल्यवान मुद्देमाल यामध्ये काही दस्तऐवज असल्यामूळे सदरचे पत्र अभिलेखावर शोध घेणे गरजेचे आहे. तरीसुध्दा तपासी अंमलदार हे आज सकाळी ११.३० पासून न्यायालयासमक्ष हजर असून सदरचा अभिलेख हा भक्कम असल्यामूळे दस्तऐवज,

निशाणी पडलेले दस्तऐवज, जनरल मुद्देमाल, मौल्यवान मुद्देमाल या सर्वांचे अवलोकन ४.३० पर्यत करत होते. त्यामूळे भक्कम अभिलेखाचे संपुर्ण अवलोकन पुर्ण झाले नसल्यामूळे त्यांची शारीरीक क्षमता तसेच वयाचा विचार करुन सदर प्रकरणात दि.१६.०७.२०२६ पर्यत साक्षीदार यांचे विनंतीवरुन तहकुब करण्यात येते. )

माझे समक्ष

(श्रीमती एम.वाय.डोईफोडे)
मुख्य न्यायदंडाधिकारी,
वर्धा, दिनांक ०९.०७.२०२६.